**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** भोसरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0122 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/04/2025 03:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 05/04/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/04/2025
**Time From (वेळेपासून):** 09:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/04/2025 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 010
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/04/2025 02:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भोसरी पोलीस स्टेशन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन गणपत वाळुंज

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वास्तु टवर, ,फ्लट नंबर- 703, ,गव्हाणे वस्ती, भोसरी, पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वास्तु टवर, ,फ्लट नंबर- 703, ,गव्हाणे वस्ती, भोसरी, पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7887884288

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रेश्मा बाळु नाईकरे | | | 1. ए विंग, फ्लट नबर- 103,, कष्णा हेरिटेज, ईद्रायणी नगर, , भोसरी, पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी नितीन गणपत वाळुंज,वय-35वर्षे,व्यवसाय-दुध डेअरी,रा-वास्तु टॉवर,फ्लॅट नंबर-703,गव्हाणे वस्ती,भोसरी, पुणे-39,मोबाईल नंबर-7887884288.समक्ष हजर राहुन जबाब देतो की,"माझा भोसरी,चक्रपाणी वसाहत येथे समर्थ डेअरी या नावाने दुध डेअरी व्यवसाय आहे.दिनांक 31/03/2025 रोजी रात्री 11:00 वा.सुमारास भोसरी पोलीस स्टेशनचे पी.एस.आय.पाटील हे माझ्या डेअरीजवळ आले व त्यांनी अकरा वाजुन गेले असुन डेअरी अजुन चालु कशी? असे बोलुन चल गाडीत बस असे म्हणाले.त्यांनतर मी पोलीस व्हॅन मध्ये बसुन भोसरी पोलीस स्टेशन येथे आले. पाटील साहेबांनी मला ठाणे अमंलदार श्री.गेंगजे,पोलीस हवालदार यांचे ताब्यात देऊन खटला दाखल करण्यास सांगुन निघुन गेले.त्यांनतर श्री.गेंगजे यांनी माझे नावे एक समज पत्र कॅम्प्युटर वर टाईप करुन त्याची प्रिंट त्यांचे सही-शिक्क्यानिशी मला दिली व एका प्रतिवर माझी सही घेतली व रेश्मा नाईकरे मॅडम यांचा संपर्क क्रमांक देवुन यांना पिंपरी कोर्ट येथे भेटण्यास सांगितले.आज दिनांक 04/04/2024 रोजी नाईकरे मॅडम यांना मला भोसरी पोलीस स्टेशनला सकाळी 10.30 वा भेटण्यास बोलवले होते.परंतु मी भोसरी पोलीस स्टेशन येथे 11:15 वा च्या सुमारास पोहचल्यावर नाईकरे मॅडम न भेटल्यामुळे माझे मोबाईल क्रमांक- 7887884288 यावरुन नाईकरे मॅडम यांचे मोबाईल क्रमांक 9657599830 यावर कॉल केला असता त्यांनी मला मी कोर्टात आहे गेंगजे यांना मला फोन करायला सांगा.त्यावेळी मी श्री गेंगजे साहेब यांना भेटलो व नाईकरे मॅडम यांनी तुम्हाला त्यांना फोन करायला सांगितला आहे असे सांगितले.त्यावेळी गेंगजे साहेबांनी माझ्या समोरच नाईकरे मॅडम यांना फोन लावला.त्यांनी नाईकरे मॅडम याना ते डेअरी वाले आलेत असे सांगितले. तेव्हा त्यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला होता. त्योवेळी मॅडम म्हणाल्या की,त्यांचेकडुन 2000रु.घ्या.तेव्हा गेंगजे साहेब म्हणाले की,तो दंड आहे का तो तुमच्याकडेच घ्या. माझ्याकडे नको त्यांना कोर्टात तुमच्याकडे पाठवतो.असे म्हणुन फोन कट केला.नाईकरे मॅडम यांनी मागितलेले 2000 रु. हे कोणताही दंड नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. माझेविरुद्ध भोसरी पोलीस स्टेशन येथे मु.पो.का.कलम 33(क्ष) आर डब्ल्यु 131 अन्वये दाखल खटल्यातील दंडाची रक्कम कमी करण्यासाठी व मला कोर्टात हजर न करता परस्पर खटला मिटवण्यासाठी नाईकरे मॅडम यांनी मागितलेली 2000 रु.रक्कम ही लाच असुन ती देण्याची माझी मुळीच इच्छा नाही.नाईकरे मॅडम आणि माझ्यात कोणतीही आर्थिक देवाणघेवाण किंवा उसणवारी नाही तरी नाईकरे मॅडम भोसरी पोलीस स्टेशन याचें विरुद्ध कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे" अशी तक्रार मी दि.04/04/2025 रोजी लाप्रवि पुणे येथे श्री.गावडे पोलीस उपअधीक्षक यांचेकडे दिली होती.माझ्या तक्रारी नुसार श्री.गावडे यांनी पोलीस निरीक्षक अमोल भोसले यांना त्यांचे दालनात बोलवुन वरीलप्रमाणे हकिकत सांगुन,शासकीय पंचांना पाचारण करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर 14/50 वा.सुमारास दोन नगररचना विभागाचे शासकीय पंच पोनि भोसले यांचे कक्षात हजर झाले.सदर पंचांना पोनि भोसले यांनी माझी लेखी तक्रार पंचांना दाखविली व मी सांगितलेली हकिकत माझ्या लेखी तक्रारीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुन पंचांनी माझे लेखी तक्रारीवर त्यांचे नावासह सहया केल्या.त्यानुसार दिनांक 04/04/2025 रोजी लोकसेविका नाईकरे मॅडम यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन नाईकरे मॅडम यांचेकडे पडताळणीकामी माझे सोबत व्हॉईस रेकॉर्डर देऊन शासकिय पंच श्री.महाडीक यांचेसह पिंपरी कोर्ट,नेहरु नगर येथे पाठवले असता,नाईकरे मॅडम यांची पिंपरी कोर्ट येथे भेट न झाल्यामुळे,मी माझे मोबाईल क्र.7887884288 यावरुन नाईकरे मॅडम यांचे मोबाईल क्रमांक 9657599803 यावर कॉल केला असता,लोकसेविका श्रीमती रेश्मा नाईकरे मॅडम यांनी मला दिनांक 05/04/2025 रोजी सकाळी 10 ते 11 वा.चे दरम्यान भोसरी पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले.त्यानुसार दि.04/04/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित त्यानुसार पुढील कारवाई दि.05/04/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.अमोल भोसले यांनी दि.05/04/2025 रोजी लोकसेविका नाईकरे मॅडम यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन लोकसेविका नाईकरे मॅडम यांचेकडे

पडताळणीकामी माझे सोबत व्हॉईस रेकॉर्डर देऊन शासकिय पंच श्री.महाडीक यांचेसह सकाळी 09/50 वा. सुमारास भोसरी पोलीस स्टेशन येथे पाठवले असता,त्यावेळी आमचेत माझेविरुद्ध दाखल असलेल्या खटल्याच्या दंडाबाबत चर्चा सुरु असताना,त्यावर नाईकरे मॅडम मला " पैसे आणले का, पैसे आणले का?" असे म्हणाल्या त्यावर मी,नाईकरे मॅडम यांना "आं..किती भरायचे ते सांगा ना"असे बोललो असता,नाईकरे मॅडम मला "काय नाय, तुमचं कसं करायचं मग,फोन पे ने थोडी कॅश भरली जाती,तिथं कॅश भरली जाती" असे म्हणाल्या,त्यावर मी नाईकरे मॅडम यांना "सांगा ना मला,काय,किती,कारण का मला"असे बोललो असता,नाईकरे मॅडम मला "हजार,दीड हजार दंड बसल तुम्हाला कोर्टात,साहेबांसमोर हजर होताय का?काय करताय?"असे म्हणाल्या,त्यावर मी नाईकरे मॅडम यांना "नाय इथल्या हिथं,काय होत असलं तर"असे म्हणालो,त्यावर नाईकरे मॅडम मला "तुम्ही कॅश नाय आणली आणि इथलच्या इथ,बरं मग आता केसचं कस करायचं"असे म्हणाल्या,त्यावर मी नाईकरे मॅडमला "काहीतरी कमी बघा ना मॅडम,जरा काही तरी"असे म्हणाल्या,त्यावर नाईकरे मॅडम मला "तिथं तो माग कॅन्टीनवाला आहे ना,हजार रुपये स्कॅन करुन देवुन टाक"असे म्हणाल्या,यावर मी नाईकरे मॅडम यांना "मी काय करतो,बारका भाउ इथं लांडेवाडीत दुकानावर,पाचचं मिनीटांत तो ना" असे म्हणालो त्यावर नाईकरे मॅडम मला "ठीकय जावुन या,तोपर्यंत मी माझे काम करते" असे म्हणाल्या,त्यावर मी नाईकरे मॅडम यांना "मॅडम परत काय होणार नाय ना"असे म्हणालो, त्यावर नाईकरे मॅडम मला "नाय नाय,एखांदा कधी फोन आला,लोकअदालतला ये,आता तु मला दिला तर,दीड दोन हजार रुपये दंड, लोकअदालतला बोललं तर,दोनशे ते पाचशे,लईत लई पाचशे असतो तेव्हा बोलायचं नाय,हे असं कसं मॅडमने तर असं केलं होतं ते कसं काय पुढं गेलं"असे म्हणाल्या,यावर मी नाईकरे मॅडमला "आता काय पावती वगैरे बनती का याची"असे म्हणालो,त्यावर नाईकरे मॅडम मला "नाय नाय आता नाय,लोकअदालतमध्ये पावती भेटती,साहेबांसमोर तुम्हाला,हजर करते,पण आज तुम्हाला दोन हजार रुपये दंड पडण",असे म्हणाल्या त्यावर मी नाईकरे मॅडम यांना "दोन हजारपर्यंत"असे म्हणालो,त्यावर नाईकरे मॅडम मला "इतर वेळेस जास्त घेत्यात साहेब कलमानुसार"असे म्हणाल्या,त्यावर मी नाईकरे मॅडम यांना "हजार रुपयेच ना"असे म्हणालो,त्यावर नाईकरे मॅडम मला "हां..."असे बोलुन 1,000/-रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न होवुन 1,000/-रुपये भोसरी पोलीस स्टेशन येथे पुढील पाच मिनीटांत घेवुन येण्यास सांगितले.त्याप्रमाणे लागलीच सापळा कारवाई करण्याचे ठरवून पो नि भोसले यांनी दोन पंचासमक्ष मला लोकसेविका नाईकरे मॅडम यांनी लाचमागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्याकरीता लाच रक्कम हजर करण्यास सांगितले,त्यावेळी मी माझ्या बचतीमधील रु.1,000/-रुपये पोनि अमोल भोसले यांचे समक्ष हजर केले.त्यानुसार पोनि भोसले यांचे सुचनेनुसार मपोशि शेटे यांनी दोन्ही पंच व मला अँथ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले व मी हजर केलेल्या 500/-रु.दराच्या भारतीय चलनातील 2 ख-या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन त्या नोटांना अँन्थ्रॉसिन पावडर लाऊन सदर नोटा मपोशि शेटे यांनी माझे शर्टाच्या पुढील डावे बाजुच्या खिशात ठेवल्या,सदरची लाचरक्कम श्रीमती नाईकरे यांना देणेकरीता पोनि भोसले यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच नं 1 यांचेसोबत भोसरी पोलीस स्टेशन येथे सकाळी 11/02वा. सुमारास रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि भोसले व उर्वरीत सापळा पथक रवाना झाले.मी व पंच क्र.1 असे माझे महींद्रा झायलो गाडी क्र.एम एच 14 ई वाय 6076 याने भोसरी पोलीस स्टेशनच्या बाहेर गाडी लावुन मी व पंच क्र.1 श्री.महाडीक आतमध्ये चालत जात असताना मी नाईकरे मॅडम यांना फोन करुन भोसरी पोलीस स्टेशन येथे आल्याचे सांगितले व त्यांनी मला लगेचच कॅन्टीनच्या दिशेने बोलविले,त्यावेळी पोनि भोसले व सापळा पथक असे माझे पाठोपाठ भोसरी पोलीस स्टेशन येथे येत असल्याचे मी पाहिले.त्यानंतर नाईकरे मॅडम यांनी मला त्यांचे पाठीमागे हाताने खुणावुन बोलविले.व महिला कक्षाच्या पाठीमागील बाजुस बोलावले त्यांना "इकडला रोडच नाही भेटला मला"असे म्हणालो,त्यावर नाईकरे मॅडम मला "किती वेळ थांबायच दया,परत आला कधी फोन तेव्हा या हा" असे म्हणाल्या त्यावर मी माझ्या शर्टचे डाव्या बाजुचे खिशातील लाच रक्कम माझे उजव्या हाताने काढुन नाईकरे मॅडम यांचेसमोर धरली त्यांनी ती उजव्या हाताने स्वीकारुन,त्यांनी परिधान केलेल्या खाकी पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली.त्यानंतर मी लाच रक्कम स्वीकारलेबाबात पुर्वनियोजित इशारा करणेकरीता पोनि भोसले व सापळा पथक यांचेकडे आलो,त्यावेळी मी माझ्याकडील रुमालाने तोंड पुसुन तो झटकुन लाच रक्कम स्वीकारलेचा इशारा पोनि भोसले व पथकास केला.त्यानंतर पोनि भोसले व सापळा पथक महिला कक्षाचे मागील बाजुस लोकसेविका श्रीमती नाईकरे यांना ताब्यात घेण्याकरीता जात असतानाच नाईकरे मॅडम त्यांचे दुचाकीने पिंपरी कोर्ट येथे निघुन गेल्या.त्यानंतर पोनि भोसले यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला.त्यानंतर पोनि भोसले,सापळा पथक,दोन्ही पंच आणि मी शासकीय वाहनाने पिंपरी कोर्ट येथे गेलो.पोनि भोसले,पथक,दोन्ही पंच व मी 11/23 वा.सुमारास पिंपरी कोर्टाच्या बाहेरील सार्वजनिक परिसरात असताना,श्रीमती नाईकरे मॅडम फोनवर बोलत बाहेर आल्या त्यावेळी पोनि भोसले यांनी लोकसेविका नाईकरे मॅडम यांना ताब्यात घेतले.व पुढील कारवाईकरीता भोसरी पोलीस स्टेशन येथे शासकीय वाहनाने घेवुन आलात.त्यानंतर भोसरी पोलीस स्टेशन येथील

ावि
रा. फ्लेट
२५०२.
हाजी



बारनिशी कक्षातील लाईट बंद करून कृत्रिम अंधार केला.श्रीमती नाईकरे मॅडम यांना त्यांनी स्वीकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष काढुन देण्यास सांगितले असता,त्यांनी परिधान केलेल्या खाकी रंगाचे पॅन्टचे उजव्या बाजुचे मागील खिशातुन लाच रक्कम आणि त्याव्यतिरीक्त 1500/-रोख रक्कम काढुन दिली.त्यानंतर पोनि भोसले यांनी पंच क्र.2श्रीमती पाटील यांना,लोकसेविका नाईकरे मॅडम यांनी काढुन दिलेली लाच रक्कमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र 2श्रीमती पाटील यांचेजवळील सापळापुर्व कारवाई दरम्यान नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले.त्याप्रमाणे पंच क्र.2श्रीमती पाटील यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहलेल्या नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले.त्यानंतर बारनिशी कक्षातील कृत्रिम अंधारामध्ये लोकसेविका नाईकरे मॅडम यांचकडुन हस्तगत केलेली रक्कम व त्यांचे दोन्ही हात तसेच त्यांनी परिधान केलेल्या खाकी रंगाचे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजुस असणा-या खिशाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासले असता लोकसेविका नाईकरे मॅडम यांचे दोन्ही हातास पुढील व मागील बाजुस,बोटाच्या पे-यावर,लाच रक्कमेवर तसेच परिधान केलेल्या खाकी रंगाचे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजुस असणा-या खिशाचे आतील अँथ्रसिन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.तरी दिनांक 05/04/2025 रोजी सकाळी 09/50 वा.ते 11/16 वा चे दरम्यान भोसरी पोलीस स्टेशन येथे लोकसेविका श्रीमती रेश्मा बाळु नाईकरे,वय-32 वर्षे,पद-महिला पोलीस शिपाई ब.क्र. 2631,भोसरी पोलीस स्टेशन,यांनी,माझेविरुद्ध भोसरी पोलीस स्टेशन येथे मु.पो.का.दाखल खटल्यातील दंडाची रक्कम कमी करण्यासाठी व मला कोर्टात हजर न करता परस्पर खटला मिटवण्यासाठी 1,000/-रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन 1,000/-रुपये लाच रक्कम ही भोसरी पोलीस स्टेशन परिसर येथे स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुदध फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
BHARAT SAHEBRAO SHINDE
**Rank (**पद**):** I (Inspector) **No.(**क्र.**):** PI
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला **खबरीची** प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Sandip Bhaurao Gh

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PI

मला प्रथम खबरी अहवालाची प्रत मिळाली

(नितीन गणपत [illegible])

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**